# ठक्कर यांच्या आत्मचरित्रात शाश्वत सत्याचा आविष्कार : विनायकदादा पाटील

नाशिक (वार्ताहर) :- जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे व अनुभवातून साकारलेले मनोहरदासजी ठक्कर यांचे आत्मचरित्र वाचणाऱ्याला प्रेरणा देणारे असून शाश्वत सत्याचा आविष्कार त्यातून साधला गेला आहे. साधेपणा आणि प्रांजळ कथन हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन वनाधिपती विनायकदादा पाटील यांनी केले. मनोहरदासजी ठक्कर यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन करताना ते बोलत होते.

आत्मचरित्रातील प्रेरणादायी घटनांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना ते म्हणाले की, वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी मनोहरदासजी नाशिकला आले. कष्टातून उभे राहीले. सुरवातीला पत्नी मंजुळाबेन यांच्याबरोबर संसाराचा गाडा चालवत असताना एकच पातेले त्यांच्याकडे होते. त्यातच, एकापाठोपाठ एक अन्नपदार्थ शिजवून त्यांनी दिवस काढले. काळाच्या ओघात भांडी बदलली पण पदार्थ मात्र तेच राहीले याचे पूर्ण आकलन मनोहरदासजींना झाले असल्यामुळे ते स्थितप्रज्ञ राहील्याचेही पाटील यांनी यावेळी सांगितले.



मनोहरदासजी ठक्कर यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाचे प्रकाशन करताना वनाधिपती विनायकदादा पाटील. समवेत ठक्कर समूहाचे चेअरमन जितेंद्रभाई ठक्कर, गौरव ठक्कर, अभिषेक ठक्कर, राजेंद्र ठक्कर, मनोहरदासजी ठक्कर, मंजुळाबेन ठक्कर,महाव्यवस्थापक नरेंद्रभाई ठक्कर, निशांत ठक्कर.

'तुझे आहे तुजपाशी' या न्यायाने मनोहरदासजी आयुष्याचे मार्गक्रमण करीत राहीले. त्यामुळेच इतरांसाठी ते एक आदर्श व्यक्तिमत्व बनले. ज्ञानी माणसे अनेक असतात पण समजदार माणसे कमी असल्याचे सांगत मनोहरदासजी हे समजदार व्यक्तिमत्वांमध्ये समाविष्ट होतात असा गौरवपूर्ण उल्लेखही पाटील यांनी केला.

ठक्कर परिवाराशी स्नेह असलेले विधिज्ञ एस.एल.देशपांडे यांचेही यावेळी भाषण झाले. ते म्हणाले मनोहरदासजींना धार्मिकता, सात्विकता आणि प्रामाणिकता यांचा वारसा कुटुंबातूनच मिळाल्यामुळे व्यवसायाच्या विकासासाठी त्यांनी तोच संस्कार वापरला. कायद्याच्या चौकटीत राहून प्रामाणिक व्यवहार केल्याचेही देशपांडे म्हणाले. यावेळी प्राचार्य बेजन देसाई, खुशालभाई पोद्दार, दिग्विजय कापडिया, रमेश महाशब्दे यांचे विचार लघुचित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आले. हॉटेल एक्स्प्रेस इनच्या सभागृहात झालेल्या या समारंभास ठक्कर समुहाचे चेअरमन जितेंद्र ठक्कर, नरेंद्र ठक्कर, अभिषेक ठक्कर, राजेंद्र ठक्कर, निशांत ठक्कर आदी उपस्थित होते. या आत्मचरित्राचे शब्दांकन आनंद क्षेमकल्याणी यांनी, संपादन रवींद्र साकूरीकर यांनी तर डिझायनिंग मिडास् टचचे श्रीकांत नागरे यांनी केले आहे. या सर्वांचा वनाधिपती विनायकदादा पाटील यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजना जोशी यांनी केले. स्वातंत्र्यदिनी झालेल्या या प्रकाशन समारंभाला हितचिंतक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.